
# गोड गोड भावगीतें
## भाग १७ वा



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९५२२
११६०
REFBK-0011244
REFBK-0011244

जयहिन्द प्रकाशन : झावबावाडी, मुंबई २

• तुमच्या आवडत्या गायक-गायिकांनीं गाइलेलीं •

# गोड गोड भावगीतें

## भाग सतरावा

: संपादक :

गजानन काशीनाथ रायकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

REFBK-0011244

REFBK-0011244

जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २

: २६१ :

मूल्य पंचवीस नये पैसे

## आभार

सोळावा भाग प्रसिद्ध होऊन दोन वर्षें झालीं. रसिकांनीं सतराव्या भागाची वारंवार मागणी केल्यामुळें हा सतरावा भाग आज प्रसिद्ध होत आहे. यावेळीं आमचे स्नेही श्री. आर्. एन्. पराडकर, श्रीकांत पुरोहित व कवि सुधांशु यांनीं फार मोलाचें सहकार्य केलें त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

* ग. का. रायकर

## • गीत माला •



| | | | |
|---|---|---|---|
| मीच सुमन झालें देवा ! | ३ | मीही सुंदर तूंही सुंदर | २० |
| विठ्ठलाचे पायीं थरारली वीट ! | ४ | अमृताहुनी गोड नाम तुझें देवा | २० |
| राधिके ऐक जरा बाई ! | ५ | विठ्ठला समचरण तुझे | २१ |
| खिडकीवरल्या रातराणीला ! | ६ | शरण तुला भगवंता | २१ |
| मी गुणगुणतें केदार | ७ | सहज सख्या एकटाच | २१ |
| उद्धवा अजब तुझें सरकार | ९ | कंठांतच रुतल्या ताना | २२ |
| बाई मी विकत घेतला श्याम ! | ९ | कमाल आहे पोरांची | २३ |
| एक धागा सुखाचा | १० | डोळे हे जुल्मी गडे | २४ |
| जग हें बंदिशाला | १० | तुझ्या गळां माझ्या गळां | २४ |
| तळमळतें मी तुझ्या दर्शना | ११ | चंद्रभागेतीरीं ऐकिल्या गोष्टी | २५ |
| चंद्रा तुझीच मी रोहिणी | ११ | चला जाऊं मथुरेच्या बाजाराला ! | २६ |
| तुला पाहते रे तुला पाहते ! | १२ | कशी मी तुजला सांगू गडे | २६ |
| रुद्राक्षांच्या नकोत माळा | १३ | आज सखे पुनवेची रात | २७ |
| उर्मिले त्रिवार वंदन तुला ! | १४ | एकदां घे साईदर्शन | २८ |
| खोडिल भारी कान्हा गे | १५ | बुगडी माझी सांडली ग | २९ |
| घांस वे विठ्ठला, बोले नामदेव | १६ | वनीं एकटी दमयंती | ३० |
| अंतरींच्या गूढ गर्भी | १७ | कशी येऊं राया आतां | ३१ |
| लेक लाडकी या घरची | १७ | श्री एकनाथ महाराजांचा अभंग | ३१ |
| नांवापुढती नांव लावितें | १७ | माझ्या स्वप्नांतल्या राजा | ३२ |
| विजय पताका श्रीरामाची | १९ | | |



मुद्रक : ज. दि. देसाई : राष्ट्रवैभव छापखाना : मुंबई ४

मालक व प्रकाशक : ग. का. रायकर : झावबाची वाडी : मुंबई २

प्रथमावृत्ति : १ डिसेंबर १९६०



महाराष्ट्र राज्य महोत्सवाच्या दिवशीं, सांस्कृतिक कार्यक्रमांत भक्तिगीतें, भावगीतें लावणी, हिन्दी गीतें गाइल्याबद्दल सुप्रसिद्ध पार्श्वगायक व नभोवाणी गायक श्री. **आर्. एन्. पराडकर** यांना, महोत्सवातर्फे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या हस्तें "महाराष्ट्र राज्य महोत्सव" मुद्रा दिली.

# मीच सुमन झालें देवा !

**मीच सुमन झालें देवा, तुझ्या पूजनाला !**
**चरण कमल हारामाजीं गुंफुं दे तनूला ॥ धृ० ॥**

**जीवन माझें दोन घडीचें, सार्थक करि तूं देवा त्याचें**
**सुकून माती होईल त्याची, तुझ्या पायथ्याला ॥ मीच ॥ १ ॥**

**प्रीति-देव पूजायाला तुझ्या, कुणी येतिल बाला**
**चरणधूळ म्हणुनी मजला, लावितील भाळा ॥ मीच ॥ २ ॥**

कवि : ग. दि. माडगूळकर  संगीत व गायक : आर्. एन्. पराडकर

११२४४

# विठ्ठलाचे पायीं थरारली वीट !

विठ्ठलाचे पायीं थरारली वीट
राउळीची घाट निनादली ॥ धृ० ॥

ज्ञानोबाच्या दारीं शहारे पिंपळ
इन्द्रायणीं-जळ खळाळलें
उठला हुंदका देहुच्या वाऱ्यांत
तुका समाधींत चावळला ॥ विठ्ठलाचे ॥ १ ॥

सज्जन गडांत टिटवी बोलली
समाधी हालली समर्थांची
एका ब्राम्हणाच्या पैठणपुरींत
भिजे मध्यरात आंसवांनीं ॥ विठ्ठलाचे ॥ २ ॥

चालत्या गाडींत सोडुन पार्थिव
निघाला वैष्णव वैकुंठासी
संत माळेंतील मणि शेवटला
आज ओघळला एकाएकीं ॥ विठ्ठलाचे ॥ ३ ॥

★

संत गाडगे महाराज स्वर्गवासी झाल्यावर, मंदिरापासून तों संतांच्या दारापर्यंत सर्वांनां किति दुःख झालें असेल याची यथार्थ कल्पना वरील काव्यांत गुंफलेली आहे.

चाल व गायक : आर्. एन्. पराडकर [४] कवि : ग. दि. माडगूळकर

# राधिके ऐक जरा बाई !



भारतखंडे संगीत विद्यापीठ, लखनौतर्फे सौ. **मंगला आर्. पराडकर** या '**संगीत विशारद**' ही पदवी पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्या, त्याबद्दल त्यांना, मुंबईचे राज्यपाल, नामदार श्रीप्रकाश यांच्या हस्तें तंबोरा बक्षीस देण्यांत आला.

**राधिके, ऐक जरा बाई, हरीचा संग बरा नाहीं ॥ धृ० ॥**
**हरि हा थोरांचा ग बाळ, तुझ्यावर येइल नसता आळ**
**तुझी नच इतुकी पुण्याई ॥ हरीचा संग ॥ १ ॥**
**पुरवितो आज तुझें कोड, उद्यां तो दुसरीला गोड**
**छंद त्या नित्य नवा बाई ॥ हरिचा संग ॥ २ ॥**
**तयाच्या लागुं नको ग नादीं, चोर तो तूं अपुली ग साधी**
**अजुनिही सावध तूं होई ॥ हरिचा संग ॥ ३ ॥**
**वयाचें ठेव जरा भान, दे जरा जगाकडे कान**
**त्यांत तूं सासुरवाशिणिही ॥ हरिचा संग ॥ ४ ॥**

कवि : **सुधांशु**  गायिका : **सौ. मंगला पराडकर**

# खिडकीवरल्या रातराणीला !



खिडकीवरल्या रातराणीला
तळमळ सांगूं कशी, बाई ! मी कितिदां बदलूं कुशी ॥ धृ० ॥

महालामधलें शैय्यामंदिर, सुवर्ण मंचक त्यांतिल सुंदर
युवराज्ञी मी तरुण उपवर, मजलाबाई आज बोंचते
सावरिची ही उशी ॥ बाई मी कितिदां ॥ १

ढळत्या रात्रीं फिकी पश्चिमा, त्यावर उतरे फिका चन्द्रमा
ऊन तयाची शीतल सुषमा, दासिनों हा विंझण वारा
आज जाळतो मसी ॥ बाई मी कितिदां ॥ २ ॥

विझवा दीपक विझवा समई, जा साऱ्याजणी अंधारींही
चित्र पाहुं द्या मजला बाई, पुष्करणीशी तेथें तो अन्
येथें उभि मी अशी ॥ बाई मी कितिदां ॥ ३ ॥

कवि : श्रीनिवास खारकर * गायक : किसन नांदुरकर

 स्वररचना : आर्. एन्. पराडकर

# वहिनी पुन्हा तुला वनवास !



श्रीरामानें त्यजिलें तुजला, सरला तव सहवास
वहिनी पुन्हां तुला वनवास ॥ धृ० ॥

राजाज्ञेचें करितों पालन, नको रागवूं दीरावर पण
तुझ्या स्वरूपीं मातेचा मज, सदैव होतो भास ॥ वहिनी ॥१॥

राहिलीस तूं रावण सदनीं, शंका घेतां प्रजाजनांनीं
अपराधाविणा भाळीं जणुं हा, शिक्षा कारावास ॥ वहिनी ॥२॥

शब्द गोठले कंठ दाटला, भाव सांगुं मी कसा मोकळा
पद्मचरण हे कधीं पुन्हां मज, दिसतिल या नयनांस ॥ वहिनी ॥३॥

कवि : मधुकर जोशी [७] स्वररचना आणि गायक : आर्. एन्. पराडकर

# मी गुणगुणते केदार

मी गुणगुणते केदार...
ही सुन्न रात्र हा सुन्न दिवा...

या कायेला त्यजूनि निघाली
भेदरलेली मुकी सांवली
अनंतांतल्या तिमिर प्रवाही
ताऱ्याचा हरवे थवा...थवा...

मीच चंद्र अन् मीच रात्र ही
धुंडित फिरलें दिशा मी दाही....
सूर हरवतां गीतांत कुठें
चुकलेला जुळतो दुवा...दुवा...

आशेचे हे किरण विरागी
दूर देशीचे दूत अनुरागी
जळून पतंगापरि निराश
मी उजळत जळते दिवा...दिवा...

कवि : श्रीकान्त पुरोहित ★ गायक : आर्. एन्. पराडकर
स्वररचना : आर्. एन्. पराडकर

# उद्धवा अजब तुझें सरकार

उद्धवा, अजब तुझें सरकार !
लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरीं दरबार !

इथं फुलांना मरण जन्मतां
दगडांना पण चिरंजीविता
बोरिबाभळी उगाच जगती, चंदनमाथीं कुठार !

लबाड जोडिती इमले माड्या
गुणवंतांना मात्र झोंपड्या
पतिव्रतेच्या गळ्यांत धोंडा, वेश्येला मणिहार !

वाईट तितुके इथे पोसले
भलेपणाचें भाग्य नासलें
या पृथ्वीच्या पाठीवर ना माणसास आधार !

कवि : ग. दि. माडगूळकर * गायक : सुधीर फडके

# बाई मी विकत घेतला श्याम !

जन्मभरीच्या श्वासाइतुकें, मोजियलें हरिनाम !
बाळ गुराखी यमुनेवरचा, गुलाम काळा संताघरचा
हाच तुक्याचा विठ्ठल आणि दासाचा श्रीराम !
जितके मालक तितकीं नांवें, हृदयें तितकी याचीं गांवें
कुणा न ओळखी तरीही याला दीन, अनाथ, अनाम !

कवि : ग. दि. माडगूळकर .  गायिका : आशा भोसले

# एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे

एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे
जरतारी हें वस्त्र माणसा, तुझिया आयुष्याचें !

पांघरसी जरि असला कपडा, येसी उघडा जासी उघडा
कपड्यासाठीं करिसी नाटक, तीन प्रवेशांचें !

मुकीं अंगडी बालपणाची, रंगित वसनें तारुण्याची
जीर्ण शाल मग उरे शेवटीं, लेणें वार्धक्याचें !

या वस्त्रातें विणतो कोण, एकसारखी नसती दोन
कुणा न दिसले त्रिखंडांत त्या, हात विणकऱ्याचे !

★

## जग हें बंदिशाला

जग हें बंदिशाला !

कुणी न येथें भला चांगला, जो तो पथ चुकलेला
ज्याची त्याला प्यार कोठडी
कोठडीतले सखे सौंगडी
हातकडी कीं अवजड बेडी, प्रिय हो ज्याची त्याला !

जो तो अपुल्या जागीं जखडे, नजर न धांवे तटापलीकडे
उंबरांतले किडे मकोडे, उंबरीं करिती लीला !

कुणा न ठाऊक सजा किती तें, कोठुन आलो तें नच स्मरतें
सुटकेलागी मन घाबरतें, जो आला, तो रमला !

## तळमळतें मी तुझ्या दर्शना

सांगूं कसं रे मी तुला, सांगना...
तळमळतें मी तुझ्या दर्शना......
अबोल माझी प्रीत लाजरी, कळेल तुला श्रीहरी
झुरतें मी रे तुझ्या मीलना ॥ १ ॥
जळतां जीवन तुझेंच चिंतन, ओढ अंतरीं पायीं बंधन
काय सजा ही अशी योजना ॥ २ ॥
चंद्र उद्यांचा साक्षी ठेवून, येईल तुडवून सारे बंधन
त्याच मंदिरीं भेटशील ना ॥ ३ ॥

* * * गायिका : सौ. आशा भोसले

## चंद्रा तुझीच मी रोहिणी

चंद्रा तुझीच मी रोहिणी......
तुझ्याच गीतासवें रंगतें सुस्वर ही रागिणी !
सांजही गेली रातही गेली, वाट पाहतां काळजी उरली
जळत्या दीपावरी जळत ही अंधारीं विरहिणी !
तुला पाहतां रजनी हंसली, लाज लाजली हंसऱ्या गालीं
मनोमंदिरीं, तुझीच प्रतिमा, मिटतां ही पापणी !
सात पाऊलें संगती जावें, तुझें न् माझें मीलन व्हावें
पाहीन कां रे, स्वप्न मनींचें, जागेपणीं जीवनीं !

त्या [illegible]

भाव-भक्तिचें तया आ[illegible] तुळसी पान ॥ १ ॥
तो जेवूं घालतो नामदेव विठ्ठला
दामाजीसाठीं धेड हरी जाहला
जनीसंगती दळितो त्याला भक्तांचा अभिमान ॥ २ ॥
एकनाथसदनीं विठ्ठल भरितो घडे
तुकयाची भोळी भक्ती त्या आवडे
वारकऱ्यासह नाचूं लागे भजनांतहि भगवान ॥ ३ ॥

कवि : सुधांशु  चाल व गायक : आर्. एन्. पराडकर

# तुला पाहते रे तुला पाहते !



तुला पाहते रे तुला पाहते......
तुझी मूर्त माझ्या उरीं राहते, जरी आंधळी मी तुला पहाते !
तुझ्या संगतीचा जिवा ध्यास लागे !
तुझ्या हासण्यानें मनीं प्रीत जागे
तुझ्या गायनें मी सुखी [illegible]
[illegible] का [illegible] प्रय हो ज्याची त्याला !

जो तो अपुल्या जागीं जखडे, नजर न धांवे तटापलीकडे
उंबरांतले किडे मकोडे, उंबरीं करिती लीला !

कुणा न ठाऊक सजा किती तें, कोठुन आलो तें नच स्मरतें
सुटकेलागी मन घाबरतें, जो आला, तो रमला !



# रुद्राक्षांच्या नकोत माळा

रुद्राक्षांच्या नकोत माळा नको त्रिकाळीं स्नान
भुकेला भक्तीला भगवान !

सेवून कण्या तो विदुराचा सौंगडी
त्या सुदाम्याचिया पोह्याची आवडी
भाव-भक्तिचें तया आवडे एकच तुळसी पान ॥ १ ॥

तो जेवूं घालतो नामदेव विठ्ठला
दामाजीसाठीं धेड हरी जाहला
जनीसंगती दळितो त्याला भक्तांचा अभिमान ॥ २ ॥

एकनाथसदनीं विठ्ठल भरितो घडे
तुकयाची भोळी भक्ती त्या आवडे
वारकऱ्यासह नाचूं लागे भजनांतहि भगवान ॥ ३ ॥

# उर्मिले त्रिवार वंदन तुला !

उर्मिले त्रिवार वंदन तुला !

त्यजुनि राजसुख जरी जानकी
वनांत गेली, प्रभू-सांगाती
राजमंदिरीं तूंच साहिल्या वियोगांतल्या कळा !

उर्मिले त्रिवार वंदन तुला !

सतत साउलीसम रामाला
भ्राता लक्ष्मण कृतार्थ झाला
तुझ्या मनांतील मुक्या भावना कधीं न तो उमगला !

उर्मिले त्रिवार वंदन तुला !

अंधारांतिल तूं ज्योतीसम
आयु वेंचिलें अपुलें कणकण
सुख-तृप्तीचा कधिं न तुला गे वाराही लाभला !

उर्मिले त्रिवार वंदन तुला !

राम-जानकी वियोगांतुनी
घडलें रामायण हें भुवनीं
तुझी तपस्या, तुझा त्याग गे नच लोकीं ठसला !


उर्मिले त्रिवार वंदन तुला !

थोर चरित तूं दूर राहुनी
सुगंध भरला तूं रामायणीं
उपेक्षाच परि तुझ्या कपाळीं न्याय जगीं आगळा !

उर्मिले त्रिवार वंदन तुला !

गायक : राम फाटक  कवि : राजा मंगळवेढेकर

# खोडिल भारी कान्हा गे !



★ कवि : राजा मंगळवेढेकर ★

खोडिल भारी कान्हा गे राधे, नंदाचा बाई हा पोर !
संगती घेऊनी साथी सवंगडी होतो हा शिरजोर !
घुसळण करितां वाजवी मुरली हरवी भान चकोर !
मथुरेसी जातां दहीं, दूध लुटितो, हरि बाई चोर !
यमुनाकांठीं हरितो वसनें, लावितो बाई घोर !
कुंजवनामधिं अडवी गोपी, भुलवी नंदकिशोर !
अवखळ हरी हा म्हणवी तरी ग कुळीचा बाई थोर !

# उर्मिले त्रिवार वंदन तुला !

उर्मिले त्रिवार वंदन तुला !

त्यजुनि राजसुख जरी जानकी
वनांत गेली, प्रभू-सांगाती
राजमंदिरीं तूंच साहिल्या वियोगांतल्या कळा !
उर्मिले त्रिवार वंदन तुला !


सतत साउलीसम रामाला
भ्राता लक्ष्मण कृतार्थ झाला
तुझ्या मनांतील मुक्या भावना कधीं न तो उमगला !
उर्मिले त्रिवार वंदन तुला !

अंधारांतिल तूं ज्योतीसम
आयु वेंचिलें अपुलें कणकण
सुख-तृप्तीचा कधिं न तुला गे वाराही लाभला !
उर्मिले त्रिवार वंदन तुला !

राम-जानकी वियोगांतुनी
घडलें रामायण हें भुवनीं
तुझी तपस्या, तुझा त्याग गे नच लोकीं ठसला !
उर्मिले त्रिवार वंदन तुला !

थोर चरित तूं दूर राहुनी
सुगंध भरला तूं रामायणीं
उपेक्षाच परि तुझ्या कपाळीं न्याय जगीं आगळा !
उर्मिले त्रिवार वंदन तुला !

# खोडिल भारी कान्हा गे !



★ कवि : राजा मंगळवेढेकर ★

खोडिल भारी कान्हा गे राधे, नंदाचा बाई हा पोर !
संगती घेऊनी साथी सवंगडी होतो हा शिरजोर !
घुसळण करितां वाजवी मुरली हरवी भान चकोर !
मथुरेसी जातां दहीं, दूध लुटितो, हरि बाई चोर !
यमुनाकांठीं हरितो वसनें, लावितो बाई घोर !
कुंजवनामधिं अडवी गोपी, भुलवी नंदकिशोर !
अवखळ हरी हा म्हणवी तरी ग कुळीचा बाई थोर !

## घांस घे विठ्ठला, बोले नामदेव

पाषाणाचे टाळ, पाषाणाचे देव
घांस घे विठ्ठला, बोले नामदेव ॥ धृ० ॥

देवा पांडुरंगा, माझ्या जिवलगा
कां रुसला सांगा, माझ्यावरि ॥ १ ॥

तूंच माझा सखा, जगिं पाठिराखा
कां झाला पारखा, तुझा स्नेहभाव
देवा तुझ्यासाठीं दिली खीर वाटी
ऐक बाल-गोष्टी रुसूं नको जेव ॥ २ ॥

कवि : योगेश्वर अभ्यंकर ★ गायक : किसन नांदूरकर

## अंतरींच्या गूढ गर्भी

अंतराच्या गूढ गर्भी एकदां जें वाटलें ग
एकदां जें वाटलें तें प्रेम आतां दाटलें ग ॥ धृ० ॥

दूर सोनेरी सुखाचे पाहिले आभास मी तूं
रंगलें आभाळ पूर्वी तेंच आतां फाटलें ग ॥ १ ॥

चांदण्या रात्रींत मागें हिंडलो एकत्र दोघे
चंद्रिकेनें भाटलें जें तें तमानें दाटलें ग ॥ २ ॥

एकदां ज्यांतून मागें सूर संवादी निघाले
वंचनेनें तोडले ते स्नेहतंतू आंतले ग ॥ ३ ॥

शेवटीं मंदावलेल्या वादळी वाऱ्याप्रमाणें
राहणें झालें दिवाणें गीत गाणें कोठलें ग ॥ ४ ॥

कवि : ना. घ. देशपांडे  स्वररचना : कमलाकर भागवत

# लेक लाडकी या घरची



लेक लाडकी या घरची, होणार सून मी त्या घरची !

सौख्यांत वाढलेली, प्रेमांत नाहलेली
कळि कळि फुलून ही चढते-मंडपीं वेल मायेची !

संपतांच भातुकली, चिमुकली ती बाहुली
आली वयांत खुदखुद हंसते, होऊन नवरी लग्नाची !

हें माहेर, सासर तें, ही काशी रामेश्वर तें
उजळितें कळस दो घरचे, चंद्रिका पूर्ण चंद्राची !

× × × ×

कोकिळ कुहु कुहु बोले, तूं माझा तुझी मी झाले
ऋतु राजा तुझी वासंती, तरुतळीं इथें एकांती
कर कोमल देतां हातीं, चांदण्यांत दिवसा न्हाले ॥ १ ॥

हिंदोलत डहाळी वरती, मोहरून आपली प्रीती
निर्झरांत टिपण्या मोती, पांखरूं जिवाचें आलें ॥ २ ॥

तूं येतां सखया जवळी, फुलवेल तरुला कवळी
मधुर मंद भरतो कमळीं, पापणींत हंसतां डोळे ॥ ३ ॥

कवि : पी. सावळाराम  गायिका : लता मंगेशकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# नांवापुढती नांव लावितें



नांवापुढती नांव लावितें
मी जीवनाची दिशा ठरविते !
नांव गांव मी पुसून आले
विसरून सगळें जुनें मागलें
मनांत आणि जनांत आतां
गाजे गंधफुलाचें नातें......
सात पदाच्या गीतामधले
सूर वेढिती शामसांवळे
आनंदाच्या गंहिवरांत त्या
मी फूल होउनी हांसते !......
सौख्याच्या या सोपानावर
स्वप्न नांदतें उभारून घर
संसाराच्या सागरांत या
मी नाव होउनी फिरते......

# विजय पताका श्रीरामाची



विजयपताका श्रीरामाची, झळकते अंबरीं प्रभू आले मंदिरीं ॥ धृ० ॥

गुलाल उधळुनी नगर रंगलें, भक्तगणांचे थवे नाचले
रामभक्तिचा गंध दरवळे, गुढ्या तोरणें घरोघरीं ॥ १ ॥ प्रभू...

आला राजा अयोध्येचा, सडा शिंपला प्राजक्ताचा
सनई गातें मंजुळ गाणीं, आरति ओवाळिती नारी ॥ २ ॥ प्रभू...

श्रीरामाचा गजर होउनी, पावन त्रिभुवन झुलतें चरणीं
भक्त रंगले गुणी गायनीं, भक्तियुगाची ललकारी ॥ ३ ॥ प्रभू...

कवि : योगेश्वर अभ्यंकर  गायिका : सौ. माणिक वर्मा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# मीही सुंदर तूंही सुंदर

मीही सुंदर तूं ही सुंदर, आज भासतें सारें सुंदर
जग हें सुंदर नभ हें सुंदर, जें जें दिसतें तें तें सुंदर !

निळें भोर आभाळ मोकळें, रविकिरणांचे मळे उमलले
स्वर्गाचें बघ दार उघडलें, अमृतरसाचे सांडति पाझर !

धांव मोहना धांव लवकरी, अनंतामध्यें मारूं भरारी
आनंदाचें तुफान उठलें, सर्वांगाला पंख उगवले
सौन्दर्याचा पहा उसळला, जिकडे तिकडे अथांग सागर !

कवि : आचार्य अत्रे * गायिका : पुष्पा मराठे

# अमृताहुनी गोड नाम तुझें देवा

अमृताहुनी गोड नाम तुझें देवा
मन माझें केशवा, पाव अनंतें
सांग पंढरीराया, काय करूं यासी
कां रूप ध्यानासी, ना ये तुझें
कीर्तनीं बैसतां, मित्र नागविले
मन माझें गुंतलें, विषयसुखा
हरीदास गर्जती, हरीनाम घ्या किती
न ये माझ्या चित्तीं, नामा म्हणे

कवि : संत नामदेव  गायिका : सौ. माणिक वर्मा

# विठ्ठला समचरण तुझे * शरण तुला भगवंता

विठ्ठला समचरण तुझे धरिते
रूप सांवळें, दिव्य आगळें
अंतर्यामीं भरतें !

* *

नेत्रकमल तव नित फुललेले
प्रेममरंदें किती भरलेले
तवगुण गुंजी, घालित रुंजी
मानस भ्रमरीं फिरते !

* *

अरुणचंद्र हे जिथे उगवती
प्रसन्न तव त्या अधरावरती
होऊन राधा माझी प्रीती
अमृतमंथन करिते !

* *

जनी लाडकी नामयाची
गुंफून माला प्राणफुलांची
अर्पून कंठीं मुक्तीसाठीं
अविरत दासी झुरते !

तूंच कर्ता आणि करविता
शरण तुला भगवंता !

* *

तुझिया श्वासें पान हलतें
हर्षें तुझिया फूल फुलतें
तेज झळाळत गगनही झुलते
रवि-चंद्राचा तूं निर्माता !

* *

सुखदुःखाची ऊन साऊली
तुझीच जाणीव वेळोवेळीं
तुझ्या कृपेच्या पंखाखालीं
जीवदान तें मरणा मिळतां !

* *

देऊळ तूंचि तूंच मूर्ति
तूंच आरती पूजा भक्ती
तूंच असतां माझी पूर्ति
मागायाचें काय अनंता !

कवि : सूर्यकांत खांडेकर ] 

# सहज सख्या एकटाच

[ गायिका : आशा भोसले

सहज सख्या एकटाच येई सांजवेळीं
वाट तुझी पाहिन त्या आम्रतरूखालीं !
हिरवळींत गीत गात
सांजरंगीं न्हात न्हात
स्वप्नांना रंगवुयां लेवुनिया लाली !
अधरीं जें अडत असे
सांगिन तुज गूज असें
प्रीती ही प्रीतीविण अजुनही अबोली !
तृणपुष्पें मोहक ती
उमलतील एकांतीं
चांदण्यांत उमलवुयां प्रीत भावभोळी !

# कंठांतच रुतल्या ताना

कंठांतच रुतल्या ताना, कुठें ग बाई कान्हा
कुणितरी जा, जा, जा, जा,
घेऊनी या मोहना !
कदंब फांद्यावरी बांधिला
पुष्पपल्लव गंधित झोला
कसा झुलावा परि हा निश्चल
कुंजविहारीविना !
थांबे सळसळ जशि वृक्षांची
कुजबुज सरली झणिं पक्षांची
ओळखिचे स्वर कानिं न येतां
थबके ही यमुना !
मुरलीधर तो नसतां जवळी
सप्तस्वरांची मैफल कुठली ?
रासक्रिडेची स्वप्नें विरली
एका कृष्णाविना !

# कमाल आहे पोरांची

कमाल आहे पोरांची फिरली डोकी पोरींची
कुणी लैला, कुणी मजनू प्रेमप्रकरणें चोरीची ॥धृ०॥

* * *

नो नो पप्पा तुम्हीं नका वर पसंत करते मीच
वर मुलगाही तेंच सांगतो माझीही अट हीच
पहा, मुलें, पहा मुली, पर्वा नाहीं थोरांची ॥१॥

* * *

कधीं कुठें अन् जमेल केव्हां नाहीं कुणा ठावें
भलतें सलतें झालें म्हणजे उजेडांत यावें
तीही रडे, तोही रडे, आरडा ओरड जोराची ॥२॥

* * *

मुली ठरविण्या बाप बिचारा जाई एकीकडे
भलतीला घेऊन पळतसे बाळ्या दुसरीकडे
ना पत्ता, बे पत्ता, अब्रू जाई बापाची ॥३॥

* * *

तारुण्याच्या भरांत कोणी होऊं नका बेताल
खरें सांगतो जपून वागा होतील बरं का हाल
हसूं नका, फसूं नका, आज्ञा पाळा वडिलांची ॥४॥

## डोळे हे जुलमी गडे

डोळे हे जुलमि गडे, रोखुनि मज पाहूं नका
जादुगिरी त्यांत पुरी येथ उभे राहूं नका!
घालुं कशी कशिदा मी? होती किति सांगुं चुका
बोंचे सुई फिरफिरुनी वेळ सख्या जाय फुका!
खळबळ किति होय मनीं
हसतिल मज सर्वजणी
येतिल त्या संधि बघुनी आग उगा लावुं नका!
डोळे हे जुलमि गडे रोखुनि मज पाहुं नका!

★

## तुझ्या गळां माझ्या गळां

तुझ्या गळां माझ्या गळां, गुंफू मोत्यांच्या माळा
ताई आणखी कोणाला? चल रे दादा चहाटळा!

तुज कंठी मज अंगठी, आणखी गोऽफ कोणाला?
वेड लागलें दादाला, मला कुणाचें? ताईला ॥२॥

तुज पगडी मज चिरडी, आणखी शेला कोणाला
दादा, सांगू बाबाला? सांग तिकडल्या स्वारीला ॥३॥

खुसूं खुसूं गालिं हसूं, वर वर अपुले रुसूं रुसूं
चल निघ येथें नको बसूं, घरतर माझें तसूं तसूं ॥४॥
कशी कशी आज अशी
गम्मत ताईची खाशी
अतां गडी फू दादाशी
तर मग गट्टी कोणाशी?

# चंद्रभागेतीरीं आयिकील्या गोष्टी



चंद्रभागेतीरीं आयिकील्या गोष्टी
वाल्मीके शतकोटी ग्रंथ केला ॥
माझिया चित्तासी फार क्लेश झाले
वृथा म्यां आयुष्य गमाविलें ॥ १ ॥
जाऊनी राऊळा विठोसी विनविले
वाल्मीकीनें केलें रामायण ॥ २ ॥
असेन मी खरा तुझा भक्त देवा
सिद्धीसी न्यावा पण माझा ॥ ३ ॥
शतकोटी तुझे करीन अभंग
म्हणे पांडुरंग ऐका नाम्या ॥ ४ ॥
तये वेळीं होती आयुष्याची वृद्धी
आतांची अवघी थोडी असे ॥ ५ ॥
नामा म्हणे जरी न होतां संपूर्ण
जिव्हा उतरीन तुझ पुढें ॥ ६ ॥

कवि : संत नामदेव ★ गायिका : सौ. कुन्दा पित्रे

 स्वररचना : आर्. एन्. पराडकर

# चल जाऊं मथुरेच्या बाजाराला !

चल ग सखु दहींदूध विकूं
चल ग मथुरा बाजाराला
चल जाऊं मथुरेच्या बाजाराला
तुझं माझं घर शेजाराला — चल जाऊं० ॥ धृ० ॥
साऱ्या गेल्या पुढं — उचल तुझं घड
दिसतरि बघ बाई — मोहरला ॥ चल जाऊं० ॥ १ ॥
झपझप चाल बाई — झपझप चालू
गावठणं गेलं — आली गौळ्याची ताल
यमुनेच्या आलों बाई — किनाऱ्याला ॥ चल जाऊं० ॥ २ ॥
ओचवर धरुन् — धारपार करुन
न्याहारिच्या आंत जाऊं ठिकाणाला ॥ चल जाऊं ॥ ३ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर ★ गायक : आर्. एन्. पराडकर

# कशी मी सांगूं तुजला गडे

कशी मी सांगूं तुजला गडे
घननीळाची अबोध प्रीती माझ्यावरती जडे !
निळया जळांतील कमळें हलली
पालवती या प्रकाश वेली
किनारत्या किरणांतून अमुचें मीलन पहिलें घडे ॥
ओठावरती उमले कविता
भाव परी ना येई सांगता
स्पर्शाविन हे रोमांचाचे कतती अंगीं खडे ॥
मधु कमलांतील धुंद लाजरी
हात गुंफितां होई बावरी
वक्षावरती विसावतां हें मन झालें वेडें ॥

कवि : मधुकर जोशी  गायक : सौ. मंगला पराडकर

# आज सखे पुनवेची रात



आज सखे पुनवेची रात, आलि गडे चंदेरी रात
करी कौमुदीची बरसात ॥ ध्रृ० ॥

नाजूक कोवळी, संध्येची बाळी । नाहते ग अमृतांत,
निशा नाहते ग अमृतांत ॥ १ ॥

ढगांच्या झालरी, शोभा चंदेरी । यामा विसावली मंचकांत ॥ २ ॥

वाऱ्याची स्वारी हळुं वारा घाली । विश्व तल्लीन सुधारसांत ॥ ३ ॥

जोत्स्नेच्या मैत्रिणी चित्रा रोहिणी । दंग नर्तनीं सभागृहांत ॥ ४ ॥

कवयित्री : सौ. विजया शेवडे [२७] गायक : आर्. एन्. पराडकर

# एकदां घे साईदर्शन



जा शिरडीला उगिच कशाला करिसी तीर्थाटन
एकदां घे साईदर्शन ॥ धृ० ॥

माय द्वारका प्रेमळ आई, तात जगाचे सद्गुरु साई
धुनी अखंडित प्रसन्न जेथें, अग्नी नारायण !

राम रहिम कुणी म्हणती ज्याला, बुद्ध येसुही गमे कुणाला
जात पंथ हा भेद न उरला — मानवता शिकवण !

पूर्ण ब्रम्ह श्रीसाई अवतरे — भवभय ज्याच्या दर्शनें नुरे
उदी नव्हे तो प्रसाद गुरुचा — संजीवनीचे कण !

कवि : शिरगोपीकर  स्वररचना आणि गायक : आर्. एन्. पराडकर

# बुगडी माझी सांडली ग

बुगडी माझी सांडली ग जातां साताऱ्याला
चुगली नका सांगुं ग माझ्या म्हाताऱ्याला ॥ धृ० ॥

माझ्या शेजारीं तरुण राहतो, टकमक टकमक मला पाहतो
कधीं नाहीं ते भुलले ग बाई त्याच्या इशाऱ्याला...

आज अचानक घरीं तो आला, पैरण फेटा नि पाठीस शेमला
किती ग गोड मजसी तो गमला, दिला बसाया पार मी त्याला...

माझ्या शेजाऱ्याला, घरांत नव्हते तेव्हां बाबा माझा,
मजवर कुठला ताबा, त्याची धिटाई तोबा, वितळूं लागे ग लोणी
बाई बघतां निखाऱ्याला......

त्यानें आणिली अपुली गाडी, तयार जुपुनी खिलारी जोडी
मी ल्यालें ग पिवळी साडी, वेड्यावाणी जोडीन ग गेलों बाजाराला...

येण्या आधीं बाबा परतून पोंचणार घरांत जाऊन
मग पुसतील काना पाहून, काय तेव्हां सांगुं मी ग बाई
त्याला विचाऱ्याला......

ग्रंथ संग्रहालय, ठा... स्थल
3.100 दि:
अनुक्रम 9522 20141
क्रमांक

# वनीं एकटी दमयन्ती



काय विधीची दैवगती, वनीं एकटी दमयन्ती ॥ धृ० ॥

कोमल शय्या मृदुल तृणांची
श्रमवी काया दमयन्तीची
व्याकुळ नयनें शोधित राही, प्राणविसावा निषधपती ॥ १ ॥

कोठें असशी प्राणवल्लभा
दीप तूं सख्या मी तुझी प्रभा
हांक ऐकुनी येशील का रे? विनवूं अजुनी किती? ॥ २ ॥

किंचित खुलली नयनपाकळी
पळ ना दिसतां ती व्याकुळली
अश्रु झरती विरहीं गालीं, शिणवूं अपुले नयन किती! ॥ ३ ॥

कवि : गंगाधर महाम्बरे  गायक : दशरथ पुजारी

## कशी येऊं राया आतां



कशि येऊं राया आतां तुला भेटण्याला रे ॥ धृ० ॥
मनीं वरिलें मी तुला
जोडिदार तूं जीवनाचा
तुजविण मजला चैन नसे रे चैन नसे रे ॥ १ ॥

गायक : आर्. एन्. पराडकर * कवयित्री : सौ. रेचलबाई वरघरकर

## श्री एकनाथ महाराजांचा अभंग

कृपाळू माऊली उभी भीमातटीं
लागलीसे आशा जिवासी मोठी ॥
कई भेटेल माझा मायबाप
उजळुनि दीप ओवाळिन श्रीमुख ॥
शून्य स्थावर वापुनि वेगळा राहे
एका जनार्दनीं वंदीन त्याचे पाय ॥

स्वररचना आणि गायक : आर्. एन्. पराडकर

# माझ्या स्वप्नांतल्या राजा



REFBK-0011244

माझ्या स्वप्नांतल्या राजा—कधि भेट देशी मजला ॥ धृ० ॥

वेड लावुनी मनाला—राजहंस कोठें गेला
मावळे मैत्री क्षणाची—ओघळे माळ मोत्यांची
वाढती जिवाच्या कळा ॥ माझ्या ॥ १ ॥

किती वाट मी पहावी—विरे ओठीं गोड ओवी
प्रेम केलें तुझ्यावरी—हांसती मजला शेजारी
धरिलास कां अबोला ? ॥ माझ्या ॥ २ ॥

दाटे नभीं संध्याछाया—बावरे ही भोळी माया
चांदण्याच्या पावलांनीं—येउनी रात्रीं अंगणीं
शीळ घालिसी कशाला ॥ माझ्या ॥ ३ ॥

गायक : आर्. एन्. पराडकर [ ३२ ] कवि : सी. म. बापट